**महाराष्ट्र राज्य**
**माध्यमिक व उच्च**
**माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे**

स.न.८३२ ए, सारथी कार्यालयाजवळ, फायनल प्लॉट
नं. १७८, १७९, आघारकर संशोधन संस्थेच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे-४११००४.

**Maharashtra State**
**Board of Secondary & Higher**
**Secondary Education, Pune**

S.R.No.832-A, Near Sarthi Office, Final Plot No.178,179,
Behind Agharkar Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune- 411 004.

**Phone No.020-25705000** • **Email : secretary.stateboard@gmail.com**


क्र. रा. मं./लेखा /दुष्काळग्रस्त फी माफी- २६-२७/4550
दि.२४/१०/२०२६

प्रति,

विभागीय सचिव ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय:- राज्यात सन २०२६ च्या दुष्काळामुळे बाधित तालुक्यातील विद्यार्थ्यांना फेब्रु /मार्च २०२७ च्या परीक्षेकरीता परीक्षा शुल्क माफ करणेबाबत ....

संदर्भ :- १) शासन निर्णय क्रमांक :एफ ई डी १५९२/१२०२/[११३२] साशि-५ मुंबई ३२,दि.१८ ऑक्टोबर १९९३

२) मदत व पुनर्वसन विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक : समिती-२०२६ /प्र.क्र..८२/मदत-२ दि.२५ सप्टेंबर २०२६

३) शासन पत्र क्रमांक : संकीर्ण-२०२६/प्र. क्र.६१/एसडी-५. दि.०५ ऑक्टोबर २०२६

४) या कार्यालयाचे पत्र क्र. रा. मं./लेखा /दुष्काळग्रस्त फी माफी- २६-२७/ ४०४४ दि.२९/०९/२०२६

५) मदत व पुनर्वसन विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक: समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२ दि.१४/१०/२६

६) शासन पत्र क्रमांक : संकीर्ण-२०२६/प्र. क्र.६१/एसडी-५. दि.२३ ऑक्टोबर २०२६

उपरोक्त विषयास अनुसरून व संदर्भिय शासन निर्णय क्र.०५ अन्वये राज्यातील ३०५ तालुक्यामध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आलेला आहे. सदर दुष्काळग्रस्त ३०५ तालुक्यामधील राज्य शासनाकडून विशेष बाब म्हणून उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय झालेला आहे. शाळा व कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित झालेला आहे.

त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रु /मार्च २०२७ मध्ये घेण्यात येणाऱ्या इ १० वी व इ १२ वी परीक्षा शुल्क विद्यार्थ्यांकडून न घेता आवेदन पत्रे भरून घेण्यात यावीत. सदर आवेदन पत्रे भरताना विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी माफी योजने अंतर्गत शासन निर्णय दि.१८.१०.१९९३ मधील निकषांमध्ये केवळ या आर्थिक वर्षात एक विशेष बाब म्हणून शिथिलता देऊन योजनेची व्याप्ती वाढविण्यात येत आहे. त्यानुसार आवेदन पत्र भरत असताना परीक्षा शुल्क माफ करण्यासाठी आपल्या कार्यकक्षेतील दुष्काळग्रस्त तालुक्यातील खालील प्रमाणे विद्यार्थ्यांची फी माफीची कार्यवाही पुढीलप्रमाणे करण्यात यावी.

१. दि. १४ ऑक्टोबर २०२६ च्या शासन निर्णयानुसार जाहीर झालेल्या राज्यामध्ये दुष्काळग्रस्त भागामध्ये आपत्तीची परिस्थिती उद्भवलेल्या दुष्काळग्रस्त एकूण ३०५ तालुक्यातील मंडळाच्या माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना 'माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२७ मधील परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या पात्र विद्यार्थ्यास परीक्षा फी माफीचा लाभ देण्यात येणार आहे.

२. दुष्काळग्रस्त एकूण ३०५ तालुक्याव्यतिरिक्त इतर सर्व तालुक्यातील विद्यार्थ्यांनी विहित पद्धतीनुसार व विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरणा करणे आवश्यक आहे.

३. सदर योजना शासकीय / खाजगी अनुदानित / विना अनुदानित, स्वयं अर्थसहाय्यीत माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लागू राहील.

४. जे विदयार्थी त्याच परीक्षेस दुस-यांदा बसले असतील [रिपिटर] अशा विद्यार्थ्यांना सुध्दा लागू राहील.

५. जे विदयार्थी बहिःस्थ (एक्सटर्नल) म्हणून नोंदले असतील अशा विद्यार्थ्यांना सुध्दा लागू राहील.

६. शहरी भागात वास्तव्यास असलेले, परंतु दुष्काळग्रस्त तालुक्यातील शेतजमीन असणाऱ्या पालकांचे विद्यार्थी पाल्य यांना सुध्दा लागू राहील.

७. शिक्षणासाठी अन्य ठिकाणी /शहरात वास्तव्यास असलेले, परंतु मूळ गाव दुष्काळग्रस्त तालुक्यात असलेले विद्यार्थी यांना सुध्दा लागू राहील.

८. दुष्काळग्रस्त / टंचाईग्रस्त भागातील इ.१०वी व १२वी च्या परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील विद्यार्थांची आवेदन पत्रे सुध्दा परीक्षा शुल्क न घेता भरून घेण्यात यावीत त्यांचे परीक्षा शुल्क हे शासनाच्या संबंधीत विभागाकडून एकत्रित प्रस्ताव पाठवून राज्य मंडळा मार्फत घेण्यात येणार आहे.

९. सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), विभागीय शिक्षण उपसंचालक आणि विभागीय सचिव, विभागीय मंडळ यांनी वैयक्तिक लक्ष घालून विहित कालावधीमध्ये आवेदन पत्रे भरून घेण्याबाबत पाठपुरावा करण्याबाबत विभागीय मंडळ स्तरावरुन सूचित करावे

१०. <u>मुख्याध्यापकांनी आवेदनपत्रे भरून घेण्याची कार्यवाही 7 दिवसात करण्याबाबत त्यांना आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे. दुष्काळग्रस्त भागातील पात्र विद्यार्थ्यांचे माहिती भरण्यासाठी Institute Login मध्ये Application = Drought Entry / दुष्काळग्रस्त नोंद या option मध्ये माहिती भरावी.</u>

११ दुष्काळग्रस्त भागातील सवलतीस पात्र विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क भरणा केली असेल अशा विद्यार्थ्यांचा शुल्क परतावा रक्कम विद्यार्थ्यांच्या/पालकांच्या आधार संलग्न Bank Account मध्ये वर्ग करण्यात येणार असल्याने, विद्यार्थ्याच्या आधार क्रमांकाशी संलग्न बँक खात्याची माहिती उपलब्ध न झाल्यास अथवा चुकीची माहीती अथवा चुकीचा आधार क्रमांक दिल्यास सदर लाभापासून विद्यार्थी वंचित राहणार असल्याने परिपूर्ण माहिती निर्धारित कालावधीमध्ये भरण्याची दक्षता घेण्यात यावी, ही जबाबदारी पूर्णतः संबधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.

१२. <u>ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क शाळा/क.महाविद्यालयांनी जमा करून घेतलेले आहेत,तथापि मंडळाकडे भरणा केलेला नाही,असे जमा केलेले शुल्क त्यांचे स्तरावर विद्यार्थ्यांना तात्काळ परत करावे. ही जबाबदारी पूर्णतः संबधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.</u>

उपरोक्त प्रमाणे निकषांची व अन्य आवश्यक बाबींची संदर्भीय शासन निर्णयानुसार खात्री करून घेण्यात यावी. व त्यानुसार सदरील योजनेची अंमलबजावणीसाठी विहित मुदतीत विद्यार्थ्यांचे आवेदन पत्रे भरून घेण्यात यावीत, सर्व संबंधीताना आपल्या स्तरावरून सूचित करावे. व केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

(मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने)

(Mali)
(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४

जा. क्र. अविमं /लेखा/ 2305
दि. 26/10/2026

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
अमरावती विभाग, अमरावती.

विषय: राज्यात सन २०२६ च्या दुष्काळामुळे बाधित तालुक्यातील विद्यार्थ्यांना फेब्रु.—मार्च २०२७ च्या परीक्षेकरिता परीक्षा शुल्क माफ करणेबाबत...

अमरावती विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, राज्यमंडळाचे उपरोक्त क्र.रा.मं./लेखा/दुष्काळग्रस्त फी माफी-२६-२७/४५५०, दि.२४/१०/२०२६ च्या पत्रान्वये दिलेल्या सुचनांची नोंद घेवून पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. सदर माहिती सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांनी आपल्या सुचना फलकावर लावून सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

26/10/2026
/-विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, अमरावती विभागीय मंडळ, अमरावती

प्रत माहितीस्तव तथा तातडीच्या पुढील कार्यवाहीसाठी—

१. मा.सचिव राज्यमंडळ, पुणे.
२. मा.शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती.
३. शिक्षणाधिकारी (माध्य.) अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम.
४. विभागप्रमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक अमरावती विभागीय मंडळ, अमरावती.